जा.क्र./OW.No. 1053 /पोउआ/प्रकटीकरण /2020
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220
दिनांक/Date : 02/09/2020

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

| | | |
|---|---|---|
| विषय | :– | Best Detection of the Month Jun & Jully - 2020' उत्कृष्ट गुन्हेशोध, & Best Recovery of the Month Jun - 2020' उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत, पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत... |

मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी व उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे जुन व जुलै २०२० बेस्ट डिटेक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध व उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत याकरीताचे खालील पोलीस ठाणे यांना देण्यात आलेले आहे.

**“ अ ”**

**<u>माहे जुन – २०२० करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –</u>**

१) डोंगरी पोलीस ठाणे गु.र.क्र. ८२/२०२० कलम ३०२, ३७६(अ)(ब), ३६३, ३६६, ३५४, ३४२, २०१ भा.दं.वि.सं. सह कलम ४, ८ पोक्सो कायदा,

**<u>माहे जुन – २०२० करीताचे बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ –</u>**

२) मालाड पोलीस ठाणे गु.र.क्र. २५२/२०२० कलम ३७९, ३४ भा.द.वि

**“ ब ”**

**<u>माहे जुलै – २०२० करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –</u>**

२) माटुंगा पोलीस ठाणे, गु.र.क्र. २४८/२०२० कलम ४४७,४२७, १५३, अ (१) (२), २९५, ३४ भादवि.

सदर उत्कृष्ट गुन्हेशोधाची (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ) तसेच (बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ) उत्कृष्ट मालमतता हस्तगत बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :—**

दिनांक ०२/०९/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST DETECTION OF THE MONTH "** **माहे जुन २०२०** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुन — २०२०

| | | |
|---|---|---|
| ०१ | **डोंगरी पोलीस ठाणे परिमंडळ—०२** | **गु.र.क्र. ८२/२०२० कलम ३०२, ३७६(अ)(ब), ३६३, ३६६, ३५४, ३४२, २०१ भा.दं.वि.सं. सह कलम ४, ८ पोक्सो कायदा,** |

**—: ' अल्पवयीन मुलीचे अपहरण करून लैगीक अत्याचार व खुन ':—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** दिनांक ३०/०५/२०२० रोजी २१.३० वा. च्या सुमारास यातील फिर्यादी नामे श्री हुसेन अत्तार शेख, वय २९ वर्षे, यांच्या राहत्या घराच्या परिसरात त्यांची बळीत मुलगी नामे नायमा, वय ०७ वर्षे ही खेळण्यासाठी बाहेर गेली होती परंतु रात्रौ २३.०० वा. पावेतो ती घरी परत न आल्याने तिचा आजुबाजुच्या परिसरात शोध घेतला असता ती मिळून न आल्याने कोणीतरी अज्ञात इसमाने तिला पळवून नेले अशी खात्री झाल्याने फिर्यादी यांनी अज्ञात इसमाविरुध्द दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री हुसेन अत्तार शेख, वय २९ वर्षे, |
| **बळीत/मयत** | :— | नायमा हुसेन शेख, वय ०७ वर्षे, |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | रिजवान उर्फ जिकवान कुत्बुद्दीन शेख, वय २७ वर्षे, दिनांक १३/०६/२०२० |

**तपास कौशल्य** :— सदर गुन्हयाबाबत फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांचेकडुन संपुर्ण घटनाक्रम समजवुन घेवुन तात्काळ आजुबाजुचा परिसर तपासला तसेच श्वानपथकाची मदत घेतली व फिर्यादी राहत असलेल्या भागातील लोकांकडे चौकशी केली, डोंगरी भागातील सर्व बिल्डिंगमधील रिकामी घरे, एकटे राहणारे पुरूष, भटारखाने, कारखाने, हाउसगल्ल्या या ठिकाणी शोध घेतला परंतु मुलीबाबत कोणतीही उपयुक्त माहिती मिळून आली नाही. रेहमान शाह बाब दर्गा व डोगरी परीसरातील रहिवाशी व भिक्षेकरी यांच्या कडे मुलीचा फोटो दाखवुन चौकशी करण्यात आली परंतु मुलीबाबत काहीही उपयुक्त माहिती मिळून येत नव्हती.

डोंगरी विभाग हा दाट लोकवस्तीचा असून सदर परीसरात कोणतेही सरकारी सी.सी.टी. व्ही. नसल्याने व लॉकडाउन असल्याने सर्व दुकाने/अस्थापना बंद असल्याने सी.सी.टी.व्ही. फुटेज उपलब्ध होत नव्हते. त्यामुळे तीन दिवस अविरतपणे गुन्हे प्रकटिकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर भागातील सी.सी.टी.व्ही. असलेल्या दुकान मालकांचा शोध घेतला व त्यांना संपर्क साधुन त्यांच्या दुकानात असलेले सी.सी.टीव्ही फुटेज मिळणेकरिता विनंती केली. सदरवेळी लॉकडाउन असताना व कोविड या संसर्गजन्य आजाराची भीती दुकान मालकांच्या मनांत असताना देखील त्यांची मनधरणी करून त्यांना त्यांच्या घरातून पोलीस वाहनाने आणून दुकानांचे व बिल्डिंगचे सी.सी.टी.व्ही. फुटेज प्राप्त केले.

सदर गुन्हयात ०७ वर्षाच्या मुलीचे अपहरण झाल्याने डोंगरी परिसरातील नागरीकांनामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते व त्याचे सामाजिक दडपण तपासी यंत्रणांवर आलेले होते.

नमुद गुन्हयाच्या तपासात वरिष्ठ अधिकारी यांनी जातीने लक्ष देउन सी.सी.टी.व्ही. फुटेज मिळविणेकरिता दृढतेने संबंधितांशी संपर्क साधला. तपासी अधिकारी व गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी अंमलदारांचे वेगवेगळी पथके तयार करण्यात आली.

तपास पथकाने घटनास्थळाच्या परिसरातील विविध २० ठिकाणावर असणाऱ्या सी.सी.टी. व्ही. कॅमेऱ्यांचे २४ तासांचे फुटेज प्राप्त केले. सदर प्राप्त सी.सी.टी.व्ही. फुटेजची तपास पथकाने आठ दिवस अहोरात्र पाहणी केले असता एका फुटेजमध्ये अंधुकसारखा एक इसम लहान मुलीशी बोलताना दिसुन आला. परंतु सदर इसम स्पष्टपणे दिसत नव्हता किंवा लहान मुलगी देखील स्पष्टपणे दिसत नव्हती. सदर बाबीचा दुवा धरून पुढील कॅमेरा पाहिला असता सदर लहान मुलगी व त्या पाठोपाठ एक इसम वळण घेतल्याचे अंधुकसे दिसून आले. त्यानंतर सदर भागाची तपासणी करून त्या परिसरात काम करणारे ७० ते ८० इसमांना ताब्यात घेउन चौकशी केली व सदर संशयित इसमाबाबत माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु सी.सी.टी.व्ही. फुटेज स्पष्ट नसल्यामुळे काहीही दुवा मिळून येत नव्हता.

तपासदरम्यान बळीत मुलीबाबत अनर्थ घडले असावे असे तपासी पथकास अंदाज आल्याने त्यांनी पुन्हा सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी त्या दृष्टिने सुरू केली असता सी.सी.टी. व्ही. फुटेजमध्ये रात्रीच्या वेळी संशयित पध्दतीने गोणी वाहून नेणारे आठ ते दहा इसमांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. सदर गोणी वाहून नेणारे सर्व इसमांना संशयित ठरवून त्या भागात शोध घेण्यात आला असता सदर इसम मिळून आले. त्यांना पोलीस ठाण्यास आणून त्यांच्याकडे चौकशी करण्यात आली. परंतु त्याच्याकडून व त्यांच्याविरूध्द कोणताही दुवा मिळून आला नाही. त्याचदरम्यान गोणी वाहून नेणारेपैकी एक इसम हा गांवी निघून गेला असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे पुढील कॅमेराची तपासणी केली असता सदर गोणीमध्ये काहीतरी संशयित असावे असे वाटल्याने सदर संशयित इसमावर तपास एकाग्रित करण्यात आला. त्याचा मोबाइल क्रमांक प्राप्त करून त्याचा अभ्यास करण्यात आला.

संशयित इसमाच्या मोबाइल क्रमांकाचा अभ्यास करून त्याच्या नातेवाइकांचा शोध घेतला असता त्याचा भाऊ व मेव्हणा हा क्रॉफोर्ड मार्केट, परिसरात काम करीत असल्याचे कळले. त्यांना पोलीस ठाण्यास आणून त्यांच्याकडे संशयित इसमांस बोलावून घेण्यासाठी आवश्यक दबाव टाकण्यात आला. सदर संशयित इसम हा त्याचे राहते गांव बहराईच राज्य उत्तर प्रदेश येथून डोंगरी पोलीस ठाण्यास आला असता संशयित इसम नामे रिझवान उर्फ झिकवान कुतबुद्दीन शेख, वय २७ वर्षे यांस दि. १३/०६/२०२० रोजी ताब्यात घेउन चौकशी केली असता सदर इसम हा गुन्हयाबाबत काहीही माहिती नसल्याचे व त्याने काहीही केले नसल्याचे ठामपणे सांगत होता. अंतत: आरोपी याचे हावभावावरून सदर इसम हाच आरोपी असावा याबाबत वारंवार संशय वाटल्याने तपासी पथकातील अधिकारी व पथक यांनी कौशल्यपुर्व मानवी कौशल्याचा वापर करून आरोपीस गुन्हयाबाबत माहिती देण्यास भाग पाडले.

नमुद गुन्हयातील आरोपीताने दि. ३०/०५/२०२० रोजी २१.३० वा. ते २१.५० वा. चे दरम्यान बळीत मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करून तिचा खून केला व पुरावा नष्ट करणेकरीता मृतदेह गोणीत घालुन दि. ३१/०५/२०२० रोजी मस्जिद बंदर रेल्वे स्टेशन व सॅन्डहर्स्ट रोड रेल्वे स्टेशनच्या मध्ये, लोखंडी ब्रिजच्या खाली रेल्वे पटरीमध्ये फेकून दिला. आरोपी याचे निवेदन पंचनामा अंतर्गत मयत मुलीचा मृतदेह वरील ठिकाणाहून हस्तगत करण्यात आला. मृतदेह हा कुजलेल्या स्थितीत असताना देखील मृतदेहाच्या कपडयावरून ओळखत

पटवण्यात आली. बळीत मुलीचा बलात्कार करून खून करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात ३०२, ३७६(अ)(ब), ३६३, ३६६, ३५४, ३४२, २०१ भा.दं.वि.सं. सह कलम ४, ८ पोक्सो कायदा या कलमाची भर घालण्यात आली आली.

सदर गुन्हयात परिसरातील ०७ वर्षाच्या मुलीचे अपहरण झाल्याने डोंगरी विभागातील नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निमार्ण झाले होते व त्यामुळे सामाजिक दडपण तपासी यंत्रणांवर आलेले होते. तसेच सदरचा काळ हा लॉकडाउनचा असताना व कोविड या संसंर्गजन्य आजाराची भीती असताना देखील तपासी अधिकारी व अंमलदार यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता १५ दिवस अहोरात्र मेहनत करून आरोपीने हा गुन्हा एकटयाने केलेला असल्यामुळे याबाबत कोणताही दुवा नसताना सी.सी.टी.व्ही. फुटेजमधील अंधुक दिसणारे फुटेजच्या आधारे संशयित इसमास निश्चित केले व त्यास अटक करण्यासाठी तांत्रिक व मानवी कौशल्याचा वापर करून त्यास ताब्यात घेतले. व गुन्हयाच्या तपासादरम्यान उच्च प्रतीचे कौशल्य दाखवून अतिशय गंभीर स्वरूपाचा व सामाजिक दडपण निर्माण करणारे गुन्हयाचा तपास लावलेला आहे.

**डोंगरी. पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | संदीप वसंत भागडीकर | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | शशिकांत बाबी पाडावे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | प्रकाश लक्ष्मण लिंगे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | योगेश राघु घोरपडे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ह.क्र. २९६७४ | विकास आनंदराव राजपुरे | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.शि.क्र. ०४०४१४ | भरत खेमा कदम | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.शि.क्र. ०६१८६५ | अमित सिताराम करपाते | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.शि.क्र. ०९०७२४ | योगेश भगवान गाडावे | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.शि.क्र. ११०४२९ | मुकेश सुखलाल सोनावणे | प्रशस्तीपत्रक |

दिनांक ०२/०९/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST RECOVERY OF THE MONTH** " **माहे जुन २०२०** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ जुन — २०२०

| ०३ | **मालाड पोलीस ठाणे परिमंडळ—११** | **गु.र.क्र. २५२/२०२० कलम ३७९, ३४ भा.द.वि.** |
|---|---|---|

**—: ' दिवसा रात्रौ घरफोडी ' :—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** दिनांक १२/०६/२०२० रोजी रात्री २२.३० वा. ते ०९.०० वा. च्या सुमारास यातील फिर्यादी श्री किशन रमेश ठाकुरीया, हि/३० वर्षे, यांची होंडा डिओ कपनीची मो/सा क्रमांक MH-47-AA-6306 ही पार्क करुन ठेवली असता कोणी तरी अज्ञात इसमाने त्यांची मोटर सायकल त्यांच्या समतिशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी करुन नेली म्हणुन त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री किशन रमेश ठाकुरीया, वय ३० वर्षे, |
| **चोरीस गेलेली मालमत्ता** | :— | पांढऱ्या व निळया रंगाची होंडा डिओ MH-47-AA-6306-<br>इंजिन क्रमांक — JF39EU2202455.<br>चेसिस क्रमांक — ME4JF39DLHU119080.<br>किंमत अंदाजे — रु. २०,०००/— |
| **हस्तगत मालमत्ता** | :— | विविध कंपनीच्या एकुन ३७ मोटर सायकल्स कि.अं. १०,६२,०००/— रूपये |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | विधीसंघर्षग्रस्त बालक नामे :—<br>१) सतिश विनोदकुमार जैसवार वय १६ वर्षे<br>२) किशन उर्फ श्रीकृष्ण अमरेश दुबे वय १४ वर्षे,<br>३) अविनाश खरपत्तु राम उर्फ अंशु वय १६ वर्षे<br>अटक दि. १५/०६/२०२० रोजी |

**तपास कौशल्य** :— कोवीड—१९ विषाणूच्या संसंर्गामुळे कोरोनाच्या प्रादुर्भावाचे अनुषंगाने पुर्ण मुंबईत लॉकडाऊन असताना देखील मालाड पोलीस ठाणे तसेच आजुबाजुच्या पोलीस ठाणेच्या हद्दीतुन मोटर सायकल चोरी होण्याचे प्रमाण वाढले होते. सदर मोटर सायकल चोरीच्या गुन्हयांसंबंधाने पोउपनि बनसोडे, पथकाने नमुद गुन्हयाचे घटनास्थळ व आजुबाजुच्या परीसरातील सर्व इमारतींचे सिसिटिव्ही फुटेजचे अत्यंत काळजीपुर्वक निरीक्षण केले. परंतु कोणताही दुवा हाती लागला नाही. सदर गुन्हयाबाबत पोउनि बनसोडे व पथकाने त्यांचे खास गुप्तबातमीदारांना गुन्हयाची माहिती देवून मोटर सायकल चोराचा माग काढण्याच्या सुचना देवून त्यांना सक्रीय केले.

पोउनि बनसोडे व पथकास गुप्तबातमीदारामार्फत खात्रीलायक बातमी प्राप्त झाली की, अंबुजवाडी झोपडपट्टी मालवणी येथे एक युवक त्याच्या सहकाऱ्यांच्या मदतीने मोटर सायकली चोरी करुन विक्री करतो. सदर बातमीची खातरजमा करण्याचे वरिष्ठांकडुन आदेश प्राप्त करून अधिक माहिती घेता, सदरचा युवक हा मिठ चौकी, मार्वे रोड, जनकल्याण नगर व मालवणी परिसरात जास्तीत जास्त वावरत असल्याचे समजले. नमुद संशयीत युवकाबाबत त्याचे संपर्कातील इसमांकडून माहिती काढली असता, तो मोटार सायकल रायडर असल्याची अधिक माहिती प्राप्त झाली. तसेच त्याचा वावर मालाड पोलीस ठाणे व मालवणी पोलीस ठाणे हद्दित असल्याने सदर पथकाने नमुद ठिकाणी गोपनियरित्या भर पावसात सलग १७ तास त्याचेवर पाळत ठेवली.

पोउनि बनसोडे व पथक हे अंबुजवाडी झोपडपट्टी मालवणी येथे पावसात गुप्त टेहाळणी करीत असताना गुप्तबातमीदारांने कथन केलेल्या वर्णनाचा युवक मोटर सायकलवर एका मुलासोबत संशयीतरित्या जाताना दिसला. गुप्त बातमीदारांने सांगितलेल्या वर्णनाचा तोच युवक असावा याबाबत खात्री वाटल्याने पोउनि बनसोडे व पथकाने मोटर सायकलवरुन त्यांचा पाठलाग करुन त्यांना पकडले. पोउनि बनसोडे व पथकाने त्याचेकडे जुजबी चौकशी केली असता नमुद दोन्ही युवकांनी उडवाउडवी उत्तरे दिली. सदर पथकास त्या युवकाचा संशय आल्याने व गुप्तबातमीदारांने सांगितलेले तेच मोटर सायकल चोर असल्याची खात्री झाल्याने पोउनि बनसोडे व पथकाने त्यांचेकडे चौकशी करून सदर मुलास ताब्यात घेवून त्यांचेकडुन सुमारे ४,६५,०००/ रूपये किंमतीच्या विविध कंपणीच्या १६ मोटार सायकली हस्तगत केल्या.

नमुद गुन्हयातील संशयीत विधीसंघर्षग्रस्त बालक सतिश विनोदकुमार जैसवार याचेकडे नमुद पथकाने कसुन सखोल चौकशी केली असता, त्याने त्याचे मित्र किशन उर्फ श्रीकृष्ण अमरेश दुबे, वय १४ वर्षे व अविनाश खरपत्तु राम, उर्फ अंशु, वय १६ वर्षे यांचे मदतीने वर नमुद गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले. आरोपी क्र. ०१ सतिश विनोदकुमार जैसवार, याचकडुन निवेदन पंचनाम्याअंतर्गत नमुद गुन्हयात चोरीस गेलेली पांढऱ्या व निळया रंगाची होंडा डिओ MH-47-AA-6306 ही मो/स्कुटी तसेच इतर पंधरा चोरीच्या मोटार सायकली लपवून ठेवलेल्या जागेवरून दोन पंचासह जावून सविस्तर पंचनाम्यान्वये गुन्हयात हस्तगत करण्यात आल्या. तसेच तपासादरम्यान आरोपी क्र. ०२ किशन उर्फ श्रीकृष्ण अमरेश दुबे, याचेकडुन निवेदन पंचनाम्याअंतर्गत सुमारे ३,०७,०००/— रूपये किंमतीच्या एकुण ११ मोटार सायकली व आरोपी क्र ०३ अविनाश खरपत्तु राम उर्फ अंशु, याचेकडुन निवेदन पंचनाम्याअंतर्गत सुमारे २,९०,०००/— रूपये किंमतीच्या १० मोटार सायकली हस्तगत करण्यात आल्या.

तसेच पोउनि बनसोडे व पथकाने ताब्यातील तीनही विधीसंघर्षग्रस्त बालकांकडे मानवी कौशल्याद्वारे चौकशी केली असता, त्यांनी मालाड पोलीस ठाणे, चारकोप पोलीस ठाणे, कांदिवली पोलीस ठाणे, बांगुर नगर पो. ठाणे, बोरीवली पो. ठाणे, गोरेगाव पो. ठाणे, कस्तुरबा मार्ग पो. ठाणे, वनराई पोलीस ठाणे व इतर पोलीस ठाण्यांच्या हद्दित मोटर सायकल चोरी केल्याचे सांगितले. त्यांनी केलेल्या निवेदनान्वये त्यांच्याकडुन मालाड पोलीस ठाणे तसेच इतर पोलीस ठाणे यांच्या हद्दीतील चोरी झालेल्या एकुन रु. १०,६२,०००/ रूपये किंमतीच्या विविध कंपनीच्या एकुण ३७ मोटार सायकली सविस्तर पंचनाम्यान्वये हस्तगत करण्यात आल्या आहेत.

**मालाड. पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | जॉर्ज फर्नांडीस | प्रशस्तीपत्रक |
| २ | पेलीस निरीक्षक (गुन्हे) | गुलझारीलाल फडतरे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरिक्षक. | नागनाथ हरी बनसोडे. | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ह.क्र. ५७११ | रामचंद्र मारूती जगदाळे, | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ना.क्र.३३०३५ | राजेश व्यंकटेश तोंडवलकर | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.शि.क्र. ०६१८६२ | स्वप्निल सुरेंद्र काटे | प्रशस्तीपत्रक |

दिनांक ०२/०९/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST DETECTION OF THE MONTH** " **<u>माहे जुलै २०२०</u>** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## <u>(ब) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुलै – २०२०</u>

| | | |
|---|---|---|
| **१** | **मांदुगा पोलीस ठाणे** | **गु.र.क्र. २४८/२०२० कलम ४४७,४२७, १५३, अ (१) (२), २९५, ३४ भादवि.** |

### —: ऐतिहासिक वास्तुचे नुकसान केले बाबत :—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** सदर गुन्हयाची थोडक्यात हकिगत अशी की, सदर गुन्हयातील फिर्यादी नामे श्री.भीमराव यशवंतराव आंबेडकर वय ६० वर्षे राजगृह ही इमारत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत: बांधलेली असून,त्यांचे वास्तव्य असलेले राजगृह आहे. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे मेमोरियल व लायब्ररी या इमारतीमध्ये आज देखील आहे. म्हणून ही ऐतिहासिक वास्तू असल्याने त्याची नोंद पुरातत्व खात्यामध्ये आहे.

दि.०७/०७/२०२० रोजीचे सायंकाळी १७.०० ते १७.३० वाजेच्या दरम्यान प्लॉट नं १२९ राजगृह, हिंदू कॉलनी, खारेघाट रोड दादर (पुर्व) मुंबई ४०००१४. या इमारतीतीचे आवारात एक अनोळखी व्यक्ती वय अंदाजे २५ ते ३० वर्षे, त्याने इमारतीमध्ये अनधिकृत प्रवेश करून सदर इमारती मधील कपाऊंड वॉल लगत असलेल्या ८ ते १० फुलझाडाच्या कुडयांचे व इमारतीच्या खिडक्यांच्या काचांचे खोडसाळपणे नुकसान केले म्हणून, सदर इसमाविरूध्द कायदेशीर कारवाई होण्यासाठी दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.क्र. २४८/२०२० कलम ४४७,४२७, भादवि अन्वये नोंद करण्यात आला.

| | |
|---|---|
| फिर्यादी:— | फिर्यादी नामे श्री.भीमराव यशवंतराव आंबेडकर वय ६० वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | १) उमेश सिताराम जाधव वय ३५ वर्षे<br>(अटक दि.०९/०७/२०२० वेळ: १७.१८वा.)<br>२) विशाल उर्फ लक्ष्मण उर्फ कान्या अशोक मोरे, वय २० वर्षे,<br>(अटक दि.२२/०७/२०२० रोजी १८.०३वा.) |

**तपास कौशल्य :—** दिनांक ०७/०७/२०२० रोजी १७.०० ते १७.३० वा. पाऊस चालू होता, त्यामुळे घटनास्थळाजवळ कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळून आले नाही. प्लॉट नं १२९ राजगृह इमारत दादर या ठिकाणी असलेल्या एक सीसीटीव्ही कॅमेरामध्ये तसेच घटनास्थळाचे आजु बाजूस असणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज पाहीले असता, तेथे यातील आरोपीत इसम हा सदर राजगृह इमारतीत प्रवेश करताना व इमारतीच्या कंपाऊड लगत असलेल्या फुलझाडांच्या कुंडया पाडून त्यातील काही फुलझाडे काढून फेकून बाहेर पडताना दिसून आला. त्याचवेळी एक इसम राजगृह इमारतीचे बाहेर संशईत रित्या टेहाळणी करीत व येराझाऱ्या घालीत असल्याचे दिसून आले. यातील मुख्य आरोपीत इसम हा राजगृह इमारतीतून बाहेर पडल्यानंतर टिळकब्रिजचे खालुन दादर रेल्वे स्टेशन स्वामी नारायण मंदिरचे दिशेने घाईघाईने निघून गेल्याचे दिसले.

यातील फिर्यादी व साक्षिदार यांचे दि.०९/०७/२०२० रोजी पुरवणी जबाब नोंद करण्यात आले. सदर ठिकाणी एक संशयीत इसम हा गेल्या २ दिवसापासून राजगृहाच्या बाहेरील आवारात

फिरत असल्याचे दिसून आला. पोलीसांनी सदर इसमास ताब्यात घेवून त्याच्याकडे सदर गुन्हयाच्या अनुषंगाने सखोल तपास केला असता त्याने त्याचे नाव उमेश सिताराम जाधव वय ३५ वर्षे रा.ठी. टाटा रूग्णालय खालील फुटपाथवर, परेल मुंबई. असे सांगीतले. त्याचा सदर गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने दि. ०९/०७/२०२० रोजी १७.१८ वा. नमूद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपीताचा गुन्हयाचे घटनास्थळावरुन बाहेर जाण्याचे मार्गाचा नेमलेल्या सीसीटीव्ही फुटेज तपासणी पथकाकडून माग काढला असता तो, दादर फायर ब्रिगेड जंक्शन कडून पायी चालत दादर टी.टी. महेश्वरी, महेश्वरी जंक्शन, सायन हॉस्पीटल, सायन जंक्शन प्रियदर्शनी, कुर्ला, ब्रिज, अमरमहल, छेडा नगर, विक्रोळी, कामराज नगर मार्गे, ऐरोली ब्रिज खालुन पुढे मुलंड टोलनाका क्रॉस करुन ठाणे च्या दिशेने गेला असल्याची उपयुक्त माहीती मिळाली.

पो.नि. पाटणकर (गुन्हे), सपोनि सावंत, व पथक हे कल्याण भिवंडी परिसरात तपास करीत असताना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत कल्याण रेल्वे स्टेशन पश्चिम फुटपाथ येथे एक संशयीत इसम असलेबाबत खात्रीशिर बातमी मिळाल्याने त्यांनी सदर ठिकाणी जावुन स्थानिक पोलीसांची मदत घेवून तसेच तपास पथकामधील कुर्ला पोलीस ठाण्याचे पो.नि. पाटील त्यांचे मदतीस असलेले अधिकारी, अंमलदार यांना बोलावून सापळा रचुन नमुद इसमास घेराव घालून ताब्यात घेवून त्यास माटुंगा पोलीस ठाणेस आणून त्याचेकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता त्याचे गुन्हयाची कबुली दिली आहे. त्यास नमुद गुन्हयात दि. २२/०७/२०२० रोजी कल्याण पश्चिम रेल्वे स्टेशन फुटपाथ येथून अटक करुन गुन्हयाची उकल केलेली आहे.

**माटुंगा. पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे**

| अ.क्र | हुद्दा | नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | विजयसिंह आप्पासाहेब घाटगे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | विनय गुलाबराव पाटणकर | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहा. पोलीस निरीक्षक | दयानंद विठ्ठल सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहा. पोलीस निरीखक | विजयकुमार रामचंद्र अंबरगे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोलीस उप निरीक्षक | सुयोग तुकाराम अमृतकर | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.शि.क्र. ०९१६९० | राहुल निवृत्तीराव गजभारे. | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.ना.क्र. ९७११४१ | धर्मेंद्र विजय जुवाटकर | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.शि.क्र. ०४५१२ | राकेश सुरेश कदम | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.ना.क्र. ०५०८९० | मंगेश वसंत जऱ्हाड | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र. ०९३५७६ | राहुल अण्णा चतुर | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र. ०६११३६ | संतोष बबन पवार | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. २८०३३ | दशरथ तुकाराम अमृसकर | प्रशस्तीपत्रक |